नि.फौ.ख.क्र.४५६७/२०२१

निशाणी १३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानीः-**

**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**पुर्ण नांव** – साईनाथ जानकीराम दब्बा

**वय**– अंदाजे ४१ वर्षे, **धंदा** – नोकरी–महानगर पालीका, नागपूर,

**रा.** पाचपावली पोलीस क्वॅार्टर, नागपूर.

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती ममता आवारीवार यांचेद्वारा शपथेवर सुरुः-**

दिनांक एप्रिल २०२१ साली माझी नेमणुक धंतोली पोलीस स्टेशन येथे पोलीस शिपाई या पदावर होती. फिर्यादीने अशी तक्रार दिली होती की, विष्णु सहारे या व्यक्तीने एका कुत्र्याला लाकडी दांडयाने मारून ठार केले होते. त्यानंतर मी मृत कुत्र्याला शवविच्छेदन करण्याकरिता पशुवैद्यकीय हॅास्पीटल, सिताबर्डी, नागपूर या ठिकाणी दिनांक ३०.०४.२०२१ रोजी घेवून गेलो होतो. त्यानंतर माझे समक्ष सदर कुत्र्याचे शवविच्छेदन करण्यात आले होते व तसा अहवाल तयार करण्यात आला होता. आता मला सदरचा रिपोर्ट दाखविला. त्यावर साक्षीदार म्हणून माझी सही आहे. त्यास सहीपुरते **निशाणी १४** देण्यात येते. सदर श्वानाचा काळा रंग होता त्याच्या गळयाला मार लागलेला होता. त्यानंतर श्रीमती रामटेके यांनी सिल लावले होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपीचे वकील श्री. मोहिले यांचेद्वारा शपथेवर सुरुः-**

हे म्हणणे खरे आहे की, विष्णु सहारे यांनी कुत्र्याला लाकडी दांडयाने मारतांना मी प्रत्यक्ष पाहिले नव्हते. तपासी अंमलदार यांनी माझे बयान नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी १४ वरील माझी सही खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे श्वान प्रवास करण्याकरिता फिट आहे किंवा नाही याची तपासणी करण्याकरिता मी जिवंत श्वानाला दवाखान्यात नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, डॅाक्टरांनी जिवंत श्वानाबाबत प्रमाणपत्र व रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी मृत श्वानाला शवविच्छेदन करण्याकरिता नेले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

RAHUL KESHAVRAO GAIKWAD

Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2025.05.20 17:02:23 +0530

(राहूल के. गायकवाड)

दिनांकः–२०.०५.२०२५

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.१),

नागपूर.